**ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत DREAMS प्रणाली राबविणेबाबत मार्गदर्शक सुचना...**

# जिल्हा परिषद, परभणी
## ग्रामपंचायत विभाग

**जा.क्र./जिपप/पंचायत**-7/DREAMS-205/2020

**दिनांक** :- 15 **मे**, 2020.

**प्रस्तावना** :-

ग्रामपंचायत स्तरावर विविध विकास कामांची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात होत असते व वेळोवेळी या कामांचा प्रगती अहवाल विविध वरिष्ठ कार्यालयास सादर करावा लागतो. ग्रामसेवक पारंपरिक पध्दतीने आपल्या विकासकामांचा अहवाल (रिपोर्ट) सादर करतात. तसेच शासनास ग्रामपंचायत स्तरावरुन इतर महत्वाची माहिती सुध्दा वेळोवेळी सादर करावी लागते. माहिती तंत्रज्ञानाच्या (IT) सहाय्याने कमीत कमी वेळामध्ये अहवाल तयार व्हावा, अहवालामध्ये एकसूत्रता निर्माण व्हावी तसेच कोरोना विषाणू प्रादूर्भावाचा पार्श्वभुमीवर कागद विरहीत अहवाल संकलनासाठी अभिनव सुविधा उपलब्ध करण्याची बाब जिल्हा परिषद परभणीच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक** :-

जिल्हा परिषद, परभणी ग्रामपंचायत विभाग अंतर्गत विविध विकासकामांचा प्रगती आढावा, मुल्यमापन व सनियंत्रण करणेसाठी Development, Review, Evaluation And Monitoring System **(DREAMS)** प्रणाली खालील उद्दिष्टपूर्ती साठी सन 2020-21 करीता सुरु करण्यात येत आहे.

**उद्दिष्टे** :-

1. कोरोना विषाणू प्रादूर्भावाचा पार्श्वभुमीवर कागद विरहीत अहवाल संकलन करणे.
2. विविध विकास कामांचा प्रगती आढावा घेणे , मुल्यमापन व सनियंत्रण करणे
3. माहिती तंत्रज्ञान (IT) च्या सहाय्याने कमीत कमी वेळेमध्ये अहवाल तयार करणे
4. सर्व ग्रामपंचायतीच्या अहवालामध्ये एकसूत्रता निर्माण करणे
5. ॲपचा वापर करुन कमीत कमी श्रमामध्ये अहवाल तयार करणे
6. सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये उत्तम संवाद प्रस्थापित करणे
7. शासनास सादर करावयाची महत्वाची माहिती तत्परतेने संकलीत करणे
8. विविध सभेसाठी उपस्थित अधिकारी / कर्मचाऱ्यांची ई-प्रणालीद्वारे हजेरी घेणे
9. माहिती, शिक्षण व संवाद ई-साहित्य उपलब्ध करुन देणे
10. दैनंदिन कामकाज करताना आवश्यक सर्व शासन निर्णय एकाच क्लिकवर उपलब्ध करुन देणे

उपरोक्त उद्देशांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद परभणी अंतर्गत सर्व ग्रामपंचायतीकरीता **DREAMS** प्रणाली सन 2020-21 करीता सुरु करण्यात येत असून माहे एप्रिल, 2020 पासून पुढील सर्व अहवाल DREAMS प्रणालीद्वारे सादर करण्यात यावेत याची नोंद घ्यावी.

DREAMS ॲप Install करण्यासाठी खालील लिंकचा वापर करण्यात यावा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.app.dreamsc

सर्व अधिकारी कर्मचारी यांचे यूजर आयडी व पासवर्ड स्वतंत्रपणे कळविण्यात येतील. त्याचा वापर करुन प्रणालीमध्ये लॉगीन करावे व तद्नंतर पासवर्ड बदलून जतन करावा.

तरी सर्व गट विकास अधिकारी यांनी आपले अधिनस्त सर्व विस्तार अधिकारी (पं) व सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यांना सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश द्यावेत. DREAMS प्रणाली बाबतचे प्रशिक्षण साहित्य पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करुन देण्यात येत असुन त्याचा उपयोग करुन सर्व संबंधीतांना प्रशिक्षीत करावे.

सदर परिपत्रक जिल्हा परिषद, परभणीच्या http://zpparbhani.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे मान्यतेने व आदेशानुसार सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.**

Omprakash Manchakrao Yadav

Omprakash Manchakrao Yadav
2020.05.15
18:59:53 +05'30'

**(ओमप्रकाश मं.यादव)**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)
जिल्हा परिषद, परभणी

**प्रत माहितीस्तव सादर.**
1.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी
2.मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद परभणी
3.सर्व विभाग प्रमुख जिल्हा परिषद परभणी

**प्रति कार्यवाहीस्तव.**
1. सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती जि.परभणी.
2. सर्व विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती जि.परभणी
3. सर्व ग्राम विकास अधिकारी / ग्रामसेवक जि.परभणी.